# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-२३** **दिनांक - २६/०१/२०२४**

## मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालयात ध्वजारोहण कार्यक्रम व पोलीस विश्रामगृह तसेच पोलीस मुख्यालय इमारतीचा उद्घाटन सोहळा

मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्त कार्यालयात मा.पोलीस आयुक्त श्री.मधुकर पाण्डेय यांचे हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला.त्यावेळी मा.पोलीस आयुक्त यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यावेळी त्यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तलयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे वतीने त्यांनी नागरिकांना सुरक्षितेची हमी दिली.

सपोनि स्वप्निल कदम,नेमणुक विरार पोलीस स्टेशन,सपोनि अनंता गायकवाड नेमणुक भाईंदर पोलीस स्टेशन, पोशि संतोष मडके,नेमणुक मुख्यालय यांना मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते पोलीस दलात प्रशंसनीय सेवेबद्दल विशेष सेवा पदक व प्रशस्तीप्रत्र देवुन गौरविण्यात आले.

पोलीस विश्रामगृह तसेच पोलीस मुख्यालय इमारतीचे उद्घाटन मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते करण्यात आले.सदर कार्यक्रमासाठी मा.अपर पोलीस आयुक्त श्री.श्रीकांत पाठक, मा.पोलीस उपायुक्त(मुख्यालय) श्री.प्रकाश गायकवाड, कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग सौ योजना पाटील, उप अभियंता, एम.एम.आर.डी.ए श्री.सचिन कोठावरे, व मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालयातील इतर पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

मा.पोलीस आयुक्त श्री.मधुकर पाण्डेय यांना गुणवत्तापुर्ण सेवेबद्दल राष्ट्रपती पदक भेटल्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मा.पोलीस आयुक्त यांचे अभिनंदन केले.